जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
पुढारी



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजची विद्यार्थिनी कु. शिवानी पाटील हिने बी. एस्सी. तृतीय वर्ष फिजिक्स विषयात शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल तिचा सत्कार करताना माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य एस. वाय. होणगेकर, डॉ. मिलिंद कारंजकर, प्रा. किरण पाटील आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# नियतकालिक स्पर्धेतून कलागुणांना प्रोत्साहन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा विद्यार्थीकेंद्रित उपक्रम असून, ही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारी स्पर्धा आहे. यामध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभाग नोंदवावा,' असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये झालेल्या विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.

स्पर्धेत ७४ बिगर व्यावसायिक महाविद्यालयांनी व १९ व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला होता. १५६ विद्यार्थी व १५१ विद्यार्थिनींना अशी एकूण ३०७ विविध नियतकालिकासाठी वैयक्तिक पारितोषिके प्राप्त झाली आहेत.

विजेत्या महाविद्यालयांना फिरते चषक व प्रशस्तिपत्र प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांचे हस्ते देऊन गौरविण्यात आले. सर्वसाधारण विजेता पुरस्कार - बिगर व्यावसायिक गटामध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजचे डॉ. डी. ए. देसाई संपादित 'विवेक' नियतकालिकास प्रथम, विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगावचे डॉ. नाजिम इसाक शेख संपादित 'विजय' नियतकालिकास द्वितीय क्रमांक, तर राजे रामराव महाविद्यालय, जतच्या डॉ. श्रीकांत कोकरे संपादित 'रामविजय' नियतकालिकास तृतीय क्रमांक मिळाला. सर्वसाधारण विजेता पुरस्कार व्यावसायिक गटामध्ये सुशीला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टचे संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स, अतिग्रेचे योगेश नामदेव धुळुगडे संपादित 'उमंग' नियतकालिकास प्रथम, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी, आष्टाचे प्रा. ए. ए. जाधव

**प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन**

संपादित 'ज्ञानदा'ला द्वितीय, तर शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, यड्रावचे एस. व्ही. कुंभार संपादित 'स्पंदन' नियतकालिकास तृतीय क्रमांक मिळाला. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. श्रीकांत कोकरे, प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. संजय खोत यांनी मनोगत व्यक्त केले. प्राणिशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी संजोग माने हिने सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
पुढारी

# 'शैक्षणिक क्षेत्रात नवतंत्रज्ञान, सॉफ्टवेअरचा वापर गरजेचा'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजच्या सतत बदलत्या काळात नवतंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर्स सर्व क्षेत्रात येत आहेत. तांत्रिक गोष्टी कायम बदलत आहेत. अद्यावत होत आहेत. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रातही नवतंत्रज्ञान व सॉफ्टवेअरचा वापर गरजेचा असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज व मास्टर सॉफ्टईआरपी सोल्यूशनच्या वतीने आयोजित 'उच्च शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे होत्या.

डॉ. शिर्के म्हणाले, सध्याच्या घडीला जगाच्या एका कोप-यात राहून पारंपरीक पध्दतीने काम करत राहण्यापेक्षा नव्या तंत्रज्ञानाचा वापर करुन विकास करणे आवश्यक बनले आहे.

कार्यक्रमास प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर यांनी तर सुत्रसंचालन ग्रंथपाल नीता पाटील व आभार बलराम कोरडे यांनी मानले.

9 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'कॉलेजनी अचूक व वेळेत माहिती द्यावी'

**कोल्हापूर :** गुणवत्तापूर्ण माहिती देशाचे अचूक धोरण ठरविण्यात मदत करते. प्रत्येक महाविद्यालयाने माहिती वेळेत आणि अचूक दिली पाहिजे. या माहितीवरच राज्य आणि केंद्राचे धोरण ठरते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा सांख्यिकी कक्ष आणि शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्यातर्फे अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्व्हेक्षण कार्यक्रम प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे मानद सचिव विजय बोंद्रे होते. विद्यापीठाचे सांख्यिकी अधिकारी अभिजित रेडेकर यांनीही अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्व्हेक्षणाची माहिती सांगितली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. पी. गावडे यांनी आभार मानले.

9 FEB 2018 सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्ताधारित शिक्षणावर भर द्या

## प्रा. डॉ. आर. एस. माळी : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. ८ : शैक्षणिक संस्थांनी गुणवत्ताधारीत शिक्षणावर भर द्यावा,असे आवाहन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. आर. एस. माळी यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'उच्च शिक्षणात जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम व सुधारणा' विषयावर त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

शिवाजी विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र अधिविभाग, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग, माहिती तंत्रज्ञान अधिविभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या



कोल्हापूर : आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना डॉ. आर. एस. माळी.

संयुक्त विद्यमाने परिषदेचे आयोजन करण्यात आले.

डॉ. माळी म्हणाले, ''शैक्षणिक दर्जा ढासळला, तर त्याचा विकासावर परिणाम होतो. त्यामुळे शैक्षणिक संस्था ग्रामीण असो, की शहरी भागातील, त्या संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आपले कर्तव्य समजावे.''

डॉ. शिर्के म्हणाले, ''उच्च शिक्षणाचे जागतिकीकरण हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत सर्वच घटकांनी हे आव्हान पेलण्याच्या दृष्टीने पावले टाकणे गरजेचे आहे.'' डॉ. मोहन गौतम यांनी उच्च शिक्षणात युरोपियन व इतर राष्ट्रांमध्ये अभ्यासक्रमात सांस्कृतिक एकीकरणाच्या भूमिकेतून बहुविध सांस्कृतिकता टिकविली जात असल्याचे सांगितले. सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ.भारती पाटील यांनी काम पाहिले.

लंडन विद्यापीठातील डॉ. सुभेन्द्र डोईफोडे यांनी परिषदेत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग घेतला. उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर व प्रभाव वाढवायला हवा. त्यासाठी भारतीय उच्च शिक्षणात आवश्यक ते बदल होण्याच्या दृष्टीने विचारमंथन होऊन तातडीने कृती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रा. डॉ. ए. एम. गुरव सत्राध्यक्ष होते.

समन्वयक डॉ. प्रतिभा पाटणकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी परिषदेचे महत्त्व सांगितले. डॉ. मुरली भानारकर, डॉ. कविता ओझा, डॉ. विद्याधर खंडागळे उपस्थित होते.

9 FEB 2018

जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रात संशोधनास वाव

## - डॉ. पी. एस. पाटील

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात नॅनो सायन्स अ‍ॅण्ड नॅनो टेक्नॉलॉजी या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी होते.



**गोखले कॉलेजमध्ये झालेल्या नॅनो टेक्नॉलॉजी कार्यशाळेचे उद्घाटन रोपाला पाणी घालून करताना डॉ. पी. एस. पाटील व डॉ. ए. बी. गडकरी व इतर.**

सायन्स फॅकल्टी शिवाजी विद्यापीठाचे डीन डॉ. पी. एस. पाटील व प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून उद्घाटन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. एस. आर. घाटगे यांनी केले. कौन्सिल मेंबर प्रा. पी. के. पाटील यांच्या हस्ते डॉ. पी. एस. पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर भविष्यकाळात वाढतच राहणार असून, त्या माध्यमातून विविध क्षेत्रात संशोधनास चालना मिळणार आहे. प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी यांनी नॅनोसायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजीचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रथम सत्रात डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, दैनंदिन जीवनातील वापरात येणाऱ्या अनेक वस्तू नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित केल्या जातील. प्लास्टिक कचऱ्याचे उपयोजन करून नॅनो तंत्रज्ञानाच्या साह्याने असे धातू बनवू शकतो, जो सोन्यापेक्षा मौल्यवान असेल. या विषयावर प्रो. केसर डॉ. पी. एन. पाटील यांचे संशोधन सुरू आहे. अशाप्रकारे नॅनो सायन्स व नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रात महत्त्व वाढत आहे.

द्वितीय सत्रात बोलताना प्रा. के. डी. पवार म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रामध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे केला जातो. कॅन्सर रोगाच्या पेशी नॅनो तंत्रज्ञानाच्या साह्याने कशाप्रकारे नष्ट करून उपचार करता येईल. तृतीय सत्रात बोलताना प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी संश्लेषण व वैशिष्ट्यकृती पद्धतीमध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून प्रगती करता येईल याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठ लीड कॉलेज स्कीम अंतर्गत ही कार्यशाळा यशस्वीरीत्या झाली. कार्यशाळेस शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिल सदस्य दौलत देसाई, प्रशासन अधिकारी प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे, यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, पी. बी. झावरे, ए. एस. गाईंगडे, आर. एम. शेडम, पी. एस. शिंदे, पी. एस. खाडे, एस. आय. बागवान, ए. एम. बागवान, एस. एस. सुतार यांनी प्रयत्न केले.

9 FEB 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारती विद्यापीठात रिसर्च प्रमोशन ॲक्टिव्हिटी कार्यशाळा



कोल्हापूर : प्रमुख पाहुणे डॉ. पी. एस. पाटील यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे आदी.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
पदवी स्तरावर संशोधनाचे बीज रुजावे, या हेतूने शिवाजी विद्यापीठ व अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत फार्मसी महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षक यांच्यासाठी रिसर्च प्रमोशन ॲक्टिव्हिटी कार्यशाळा झाली. याचे आयोजन भारतीय विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथे करण्यात आले. कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रमुख पाहुणे डॉ. पी. एस. पाटील (डीन, फॅकल्टी ऑफ सायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ) यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे होते.

याप्रसंगी डॉ. एस. जी. किल्लेदार सेक्रेटरी अग्रणी महाविद्यालय योजना यांनी रिसर्च सेन्सटाझेशन स्किम या संकल्पनेंतर्गत आयोजित कार्यशाळेचे विस्तृत विश्लेषण केले. कार्यशाळेअंतर्गत ५१ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, डॉ. एन. आर. जाधव तसेच डॉ. एन. एम. भाटिया या तज्ज्ञांनी या शोधनिबंधांचे मूल्यमापन करून योग्य ते मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन तानिया मेहतर दिवे यांनी केले. प्रा. डी. व्ही. माहुली यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
9 FEB 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो टेक्नॉलॉजीमध्ये संशोधन करा

**डॉ. पी. एस. पाटील यांचे आवाहन**

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उपलब्ध तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून, 'नॅनो सायन्स व नॅनो टेक्नॉलॉजी' क्षेत्रात संशोधन करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील सायन्स विभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ लीड कॉलेज अंतर्गत गोखले कॉलेजमध्ये 'नॅनोसायन्स ॲन्ड नॅनो टेक्नॉलॉजी' या विषयावरील आयोजित कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी अध्यक्षस्थानी होते.

पाटील म्हणाले, नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून दैनंदिन जीवनातील अनेक वस्तू विकसित करता येतात. मोठ्या आकाराच्या यंत्रणा किंवा वस्तू अतिसूक्ष्म (नॅनो) स्वरूपात बनवू शकता. प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा उपयोग करून नॅनो तंत्रज्ञानाच्या सहाय्याने धातू बनवू शकतो, हा धातू सोन्यापेक्षा मौलवान आहे, या विषयावर डॉ. पाटील संशोधन करीत आहेत. प्रा. पी. एस. शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. एस. बोंगाळे यांनी आभार मानले.

यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, दौलत देसाई, डॉ. मंजिरी देसाई-मोरे, प्रा. पी. बी. झावरे, प्रा. ए. एस. गाईंगडे, प्रा. आर. एम. शेडम आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
पुढारी

# दक्षिण आफ्रिकेतील लोकशाहीतील अडसर चिंताजनक : प्रा. गोवेंद

कोल्हापूर : प्रतिनिधी

दक्षिण आफ्रिकेतील लोकशाही आणि विकासातील अडसर चिंताजनक असून त्यावर वेळीच उपाययोजना करावयास हवी, असे मत प्रा. डॉ. जोयनाथन गोवेंदर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात 'दक्षिण आफ्रिकेतील लोकशाही, विकास आणि राष्ट्रबांधणीतील अडसर' या विषयावर आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. पी. जी. जोगदंड होते. प्रा. डॉ. गोवेंदर म्हणाले, दक्षिण आफ्रिकेतील गरीबी जास्त आहे. शिक्षण अपुरे आहे. दक्षिण आफ्रिकेतील जनतेला लोकशाहीचे शिक्षण द्यावे लागेल. याचबरोबर त्यांनी नेल्सन मंडेला यांनी केलेल्या कार्याचा यथोचित शब्दांत वर्णन केले. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे गोवेंदर यांनी दिली.

9 FEB 2018 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात शुक्रवारी 'मून २०१८'चे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्या संयुक्त विद्यमाने 'मून-२०१८' चे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार ९ ते रविवार ११ फेब्रुवारी या कालावधीत हा कार्यक्रम विद्यापीठातील शाहू सिनेट हॉलमध्ये होणार आहे. शनिवार १० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता बेंगलोर नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, या कार्यक्रमात राज्यभरातून ३६ महाविद्यालयातील संघ सहभाग नोंदवणार आहेत, अशी माहिती रोटरीचे नसिर बोरसदवाला यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

बोरसदवाला म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील 'मून २०१८'मध्ये अंमली पदार्थांचा व्यापार आणि गैरवापर' 'स्त्रिया आणि लहान बालकांचा व्यापार' तसेच 'आण्विक उर्जेचा सकारात्मक वापर' या दोन विषयावर विचारमंथन होणार आहे. ३६ देशातील प्रतिनिधी या दोन विषयांबाबत आपआपल्या देशाचे धोरण मांडतील. यामध्ये बेळगावचे १४ संघ, हुबळीचा १ संघ, पुण्यातील ३ संघ, बेंग्लोरचा १ संघ उर्वरीत संघ केआयटी, डॉ. डी. वाय. पाटील, भारती विद्यापीठसह शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इतर महाविद्यालयातील आहेत. ७२ विद्यार्थी ३६ राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या युनेस्कोच्या धोरणानुसार जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी विविध देशातून प्रयत्न केले जातात. याचाच एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्यावतीने मॉडेल युनायटेड नेशन स्पर्धेचे आयोजन केले आहे. 'मून२०१८' चा समारोप रविवार ११ रोजी रोटरीयन आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे.

**रोटरीयन नसिर बोरसदवाला यांची माहिती**



9 FEB 2018
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात 'मून'चे आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग, रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्या वतीने 'मॉडेल युनायटेड नेशन २०१८' या मॉक जनरल असेम्बलीचे आयोजन १० आणि ११ फेब्रुवारी या कालावधीत करण्यात आले आहे. या जागतिक घडामोडीवर होणाऱ्या चर्चेत देशभरातील ३६ संघ सहभाग नोंदवणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन १० फेब्रुवारी रोजी स. ११ वा. बंगळूर नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांच्या हस्ते, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती रोटरियन नसीर बोरसदवाला यांनी दिली. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात मॉक जनरल असेम्बलीचे आयोजन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2018
पुण्यनगरी

# डॉ. पंडित विद्यासागर यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानविस्तार व्याख्यानमालेअंतर्गत शुक्रवार, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांचे 'करिअरचा मार्ग कसा निवडाल? पायवाट की आडवाट?' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात होणाऱ्या या व्याख्यानाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे भूषविणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असेल. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. सी. ए. लंगरे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात आज राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात 'आधुनिक भारताच्या उभारणीत राष्ट्रनिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' या विषयावर शुक्रवार, दि.९ फेब्रुवारीपासून दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात दि. ९ रोजी सकाळी १०.३० वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असेल. डॉ. भारत पाटणकर यांचे प्रमुख भाषण होईल. दि. १० फेब्रुवारी रोजी डॉ. प्रतिमा परदेशी (डॉ. आंबेडकर आणि दास्यमुक्ती), डॉ. दीपा श्रावस्ती (डॉ. आंबेडकर आणि भारतातील स्त्री-पुरुष समानता), डॉ. अशोक बाबर (डॉ. आंबेडकरांची भारतीय आधुनिकता), डॉ. प्रल्हाद लुलेकर यांची व्याख्याने होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
सकाळ

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'आधुनिक भारताच्या उभारणीत राष्ट्रनिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' विषयावर उद्यापासून (ता. ९) दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात सकाळी साडेदहा वाजता त्याचे उद्‌घाटन होईल. या वेळी डॉ. भारत पाटणकर यांचे प्रमुख भाषण होईल. तरी चर्चासत्रास विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# आजपासून राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'आधुनिक भारताच्या उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' या विषयावर शुक्रवार(ता.९) पासून दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली. शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात ज्येष्ठ विचारवंत डॉ. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते उद्घाटन होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असेल. यावेळी डॉ. भारत पाटणकर यांचे बीजभाषण होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
Times of India

# Now, students get copies of answer sheets on email

Piyush.Bhusari
@timesgroup.com

## SUK GOES DIGITAL

➤ Photocopies of answer sheets are sent in pdf format on applicant's **email id**

➤ A dedicated mobile unit has been set up to track the photocopies from CAP centres spread across **Sangli, Satara and Kolhapur** districts

➤ SUK receives over **20,000** photocopy applications every semester



➤ A student can apply for maximum **two** subjects. This generally costs **Rs 150** per subject

**Kolhapur:** In what could bring much needed respite to students, Shivaji University, Kolhapur (SUK) has started sending digital photocopies of answer sheets in pdf format to students in their personal email ids.

Director of board of examinations and evaluation, SUK Mahesh Kakade told TOI that a few conventional courses have been included in the initiative. Around 1,200 photocopies have been sent online for the winter semester exam.

Kakade said that though the university had planned the initiative an year ago, it has been successfully implemented in this winter semester examination.

Elaborating more on the digital photocopies, he said that whenever a student applies for the photocopy of a particular subject, it is sent to the applicant's personal email id once the digital copy of that subject is ready. An SMS is sent to the applicant so that he/she gets to know the status of availability of the photocopy.

Once the applicant downloads the photocopy from his email, another SMS is sent to the user stating that he/she has downloaded the photocopy.

Kakade said that a mobile unit has been formed for the said initiative which tracks the photocopies from the respective Centralised Assessment Program (CAP) centre and sends the digital version of the answer sheets in pdf format to the students.

Talking about the advantages of digital photocopies, he said the previous system of manually delivering photocopies of answer sheets was a laborious task as it used to take many days and had several flaws. One of the main flaw was that the answer sheets went missing somewhere in the transit or it would take weeks to reach candidates via post.

"Now students have nothing to worry as the time required for the entire action has been reduced significantly. We will be soon bringing other courses into the digital ambit to make this a streamlined activity," he said.

An official from the exam department said that generally after a semester result, a candidate can apply for photocopy of maximum two subjects if he/she feels there is a chance of change in the final result. This generally costs Rs 150 per subject. The official added that if a candidate wishes, he/she can apply for re-evaluation for which Rs 500 is charged per subject.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
Times of India

# Election of student body chiefs on Feb 27

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has invited nominations for the posts of general secretary and chairman in the university level student council by February 17.

The last date to withdraw the nomination papers is February 20.

Elections for the said posts are scheduled to be held on February 27.

R V Gurav, student welfare officer, SUK, told **TOI** that the student council executive body has already been formed with 14 members, with nominations from the vice-chancellor Devanand Shinde.

The general secretary and the chairman will be selected from among the 14 candidates.

According to sources, the student wings of some of the political parties too have been spotted influencing the potential student body members for the elections.

An official of the SUK, who did not wish to be named, said winning the student council elections means these parties get their potential party workers for their youth wings.

The official added, "The position also helps increase the network of the party. Since the 2019 elections are just around the corner, the victory might be a very good opportunity for the political parties to get a hold on the young voters."

Earlier, the college level and university department level representatives were selected through elections from the division on January 25.

The Shivaji University has as many as 283 affiliated colleges and more than three lakh students studying in various under-graduate and post-graduate courses in Sangli, Satara and Kolhapur.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
लोकमत

# विद्यापीठ स्पर्धेत सोनल सावंतचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** चंदिगड येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत शहाजी कॉलेजची विद्यार्थिनी सोनल



सावंत हिने सुवर्णपदक पटकाविले. तिला या स्पर्धेत पंजाब, दिल्ली, हरियाणा, कर्नाटक, मुंबई, पुणे, आदी विद्यापीठांच्या खेळाडूंशी सामना करावा लागला. तिला प्राचार्य डॉ. आर. के. शहाणेदिवाण, चेअरमन मानसिंग बोंद्रे, सचिव विजय बोंद्रे, व प्रा. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2018
पुण्यनगरी

# विवेकानंद कॉलेजचे नियतकालिक प्रथम

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या 'विवेक' वार्षिक नियतकालिकास शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत प्रथम पुरस्कार मिळाला. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आणि संपादक डॉ. डी. ए. देसाई यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. विवेकानंद कॉलेजच्या 'विवेक' अंकाने गेली सात वर्षे शिवाजी विद्यापीठाच्या बिगर व्यावसायिक गटात क्रमांक राखला. चार वर्षे प्रथम पटकाविणारे हे नियतकालिक आहे. समारंभात प्र. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी विवेक अंकाचे कौतुक केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, विद्यापीठाची ही योजना महत्वाची आहे. संपादक डॉ. डी. ए. देसाई म्हणाले, वार्षिक नियतकालिक हे एक सांघिक काम आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
लोकमत

# 'विवेक' नियतकालिकास प्रथम पुरस्कार

कोल्हापूर : येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक' वार्षिक नियतकालिकास शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक २०१६-१७ स्पर्धेत प्रथम पुरस्कार पटकविला. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आणि 'विवेक'चे संपादक डॉ. डी. ए. देसाई यांना पुरस्कार प्रदान केला. दरम्यान, 'विवेक' नियतकालिकाने गेली सात वर्षे विद्यापीठाच्या बिगर व्यावसायिक गटात आपला क्रमांक राखला आहे. त्यांपैकी चार वर्षे प्रथम क्रमांक पटकविणारे हे नियतकालिक आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2018
तरुण भारत

# कॉमर्स कॉलेजमध्ये 'संख्याशास्त्र' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये 'संख्याशास्त्र' विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेसाठी, ७ ते ८ महाविद्यालयातील सुमारे १०० हून अधिक विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला होता. कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे उपाध्यक्ष प्रसाद कामत यांची प्रमुख उपस्थिती होती. 'बिझनेस स्टॅटिस्टीक्स–स्कोप अँण्ड अॅप्लिकेशन्स' या विषयावर विद्यार्थ्यांना कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.डी. एम. काशिद, डॉ. डी. एम. सकटे व गोखले कॉलेजचे एस. एस. देसाई यांनी कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एन. एच. जाधव यांनी तर प्रा. बी. टी. नाईक यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
9 FEB 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा महाविद्यालयांमध्ये शिक्षण पद्धतीवर कार्यशाळा

प्रतिनिधी
वारणानगर

वारणा महाविद्यालयात 'भारत व परदेशातील शिक्षण आणि संशोधन पद्धती"या विषयावर एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.ए.डी. जाधव आणि डॉ. एम. सांताकुमार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.सौ.सुरेखा शहापुरे होत्या. प्रमुख वक्ते डॉ.जाधव म्हणाले जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये भारतीय विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि संशोधनामध्ये आपला वेगळा ठसा उमटविला आहे. परदेशात उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी सरकारकडून शिष्यवृत्या आणि फेलोशिप देण्याची योजना कार्यरत आहे.उच्च शिक्षणातील संशोधन आणि पदवी प्राप्त केल्यानंतर त्या शिक्षणाचे उपयोजन करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे.



**वारणानगर:वारणा महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत बोलताना वक्ते डॉ.ए.डी.जाधव. सोबत डावीकडून उपप्राचार्य डॉ.के.जी. जाधव, डॉ. एम. सांताकुमार, प्राचार्या डॉ. सुरेखा शहापुरे, डॉ. आर. बी. पाटील.**

डॉ. एम. सांताकुमार म्हणाले संशोधन प्रकल्पासाठी संशोधन समस्या निवड, समस्येची पार्श्वभूमी, संदर्भ साहित्य, तथ्य संकलन पद्धती, विश्लेषण पद्धती, याच बरोबर आर्थिक स्रोत आणि संशोधनाचा दर्जा, मांडणी, सादरीकरण, प्रकाशन आणि उपयुक्तता यांची विशेष गरज असल्याचे सांगितले. संशोधनाचा उपयोग समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे गरजेचे असल्याचे ही ते म्हणाले.

प्राचार्या डॉ. सौ. शहापुरे म्हणाल्या की,देश विदेशातील शिक्षण, उच्च शिक्षण आणि संशोधनातील संधींचे ज्ञान आत्मसात करून स्वत:बरोबर राष्ट्राची प्रगती साधावी. कार्यशाळेसाठी १५ महाविद्यालयातील दोनशे हून अधिक विद्यार्थी आणि संशोधक प्राध्यापक उपस्थित होते.

कार्यशाळेचे संयोजन आणि स्वागत– प्रास्ताविक डॉ. आर.बी. पाटील यांनी केले. सर्वश्री डॉ.ए.आर. भुसनर,डॉ. पी. एम. भोजे, डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. आर.पी. कावणे, डॉ.एस एम.आरडे, प्रा. एम. एन. पाटील,प्रा. रोहित बसनाईक, प्रा.विकास पाटील,प्रा.प्रवीण सातवेकर यांनी प्रयत्न केले. डॉ.ए.आर. भुसनर यांनी आभार मानले.